# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 33/2023 दिनांक : 23.01.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**1)विमानतळ :–**दिनांक 21.01.2023 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **माणिक पेट्रोल पंपाचे कॅबिनमध्ये कर्मविरनगर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून जुन्या भांडणाच्या कारणावरून बोलायचे आहे व झालेला वाद मिटवुन टाकु तु इकडे ये असे फोनवर म्हणाल्याने यातील फिर्यादी हा ग्यानमाता शाळेजवळील पानपट्टी जवळ गेला असता यातील आरोपीतांनी फिर्यादीस गल्लीमध्ये जावु असे म्हणताच फिर्यादीने गगल्लीमध्ये जाण्यास नकार दिले असता यातील आरोपीने मागील भांडणाचे कारणावरून त्यांचे जवळील खंजरने फिर्यादीचे पोटात डावे बाजुस किडनीजवळ मारून खुन करण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीस मारत असतांना फिर्यादी हा जिवाच्या अकांताने पळुन माणिक पेट्रोलपंपाच्या कॅबिनचे खिडकीतुन आतमध्ये जावुन फिर्यादीस जिवे मारण्याचे उद्देशाने खंजरने पाठीवर घाव घालुन दुखापत करून दोन्ही आरोपी पळुन गेले होते. त्यापैकी एकास अटक करण्यात आली आहे. वगैरे **फिर्यादी आमिरखान पि. दिलावरखान, वय 32 वर्षे, व्यापार रा. गोविंदनगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 27/**2023 कलम** 307, 504, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री अनलदास, मो. नं. 7020201376** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरीचा प्रयत्न :–

**1)मुदखेड :–**दिनांक 22.01.2023 रोजी चे 08.30 वा. चे सुमारास, **मौ. डोणगाव शिवार चंद्रकांत खांडरे यांचे शेता जवळील कॅनॉल रोडवर ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी शेताकडे मो सा ने जात असतांना त्यास थांबवुन आमचे पॉकेट शिवणगाव रेल्वे स्टेषन जवळ हरवले तिथ पर्यंत आम्हास मो सा वर सोडण्यास कळविले असता फिर्यादीने सोडत नाही म्हणाल्याने लगेच मोहनराव रामजी माने यांची मो सा आडवुन पॉकेट गुम गया म्हणुन शिवणगाव रेल्वेस्टेशन पे छोड म्हणुन फिर्यादीने सोडना म्हणल्याने त्याच्या सोबत झटापट करून चाकुचा धाक दाखवुन तेरे पास जो है दे दो म्हणुन धमाकवुन जबरी चोरी करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी चंद्रकांत राजाराम खांडरे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. डोणगाव ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 20/2023 कलम 393, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2187 आलेवार, मो.क्रं. 9158756087** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 20.01.2023 रोजी चे 13.00 ते 18.00 वा. चे दरम्यान, **विष्णुपूरी येथे एम एस ऑफिसच्या समोर ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा भाऊ नामे अन्वेश गंगाधर पाटील याने स. द. विष्णुपूरी नांदेड येथे एम एस ऑफिसच्या समोर फिर्यादीची सीबी शाईन कंपणीची मो सा क्रमांक एमएच–26/एवाय–2054 किमंती 20,000/–रूपयाची लाऊन डयुटी कामी गेला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी योगेश गंगाधर पाटील, वय 28 वर्षे, एचडीएफसी बँकेत नौकरी रा. बावलगाव ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 37/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1133 पेदे, मो. क्रं. 8208999464** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 16.01.2023 रोजी चे 14.00 ते 14.30 वा. चे दरम्यान, **काळेश्वर विष्णुपूरी येथे महादेवाच्या मंदीराचे बाहेरील पार्कीग मधुन ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा मुलगा वैभव व फिर्यादीच्या साडुचा मुलगा लक्ष्मण असे दोघे हिरो स्पलेंडर प्लस कंपणीची मो सा क्रमांक एमएच–26/एवाय–5703 किमंती 20,000/–रूपयाची वर बसुन काळेश्वर मंदीर येथील पार्कीमध्ये मो सा लावुन देर्शनासाठी गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने पार्कीग मधुन मो सा चोरून नेली. वगैरे **फिर्यादी पुरभाजी विठ्ठलराव खैरे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. धोतरा ता. पुर्णा जि. परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 38/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1133 पेदे, मो. क्रं. 8208999464** हे करीत आहेत.

**3)देगलुर :—** दिनांक 12.01.2023 रोजी चे 13.30 ते 15.00 वा. चे दरम्यान, **सिध्दार्थनगर देगलुर येथील फिर्यादीचे घरा समोरून ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो करडया रंगाची मो सा क्रं टीएस—16/इक्यु—8077 किंमती 30,000/—रूपयाची फिर्यादीच्या घरा समोरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी अशोक मारोती कुमार, वय 40 वर्षे, व्यवसाय ट्रॅक्टर मेकॅनिक रा. सिध्दार्थनगर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 34/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2822 कनकवळे, मो. क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :—

**1)उमरी :—**दिनांक 21.01.2023 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **हुंडा तांडयाकडे जाणारे रोडवर हुंडा (उ.प). ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन गावातील यात्रेमध्ये कुस्ती पाहण्याच्या कारणावरून फिर्यादीचा मुलास यातील आरोपीतांनी शिवीगाळ करून दगड फेकुन मारून मुलास गंभीररीत्या जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी पुंडलीक पि. माधवराव जोगदंड, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. हुंडा (उ.प). ता. उमरी जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 15/2023 कलम 326, 336, 143, 147, 149, 504, 506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/वावळे, मो. नं. 7038833358** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :—**दिनांक 20.01.2023 रोजी चे 23.00 वा. चे सुमारास, **देवगीरी निवासा समोर वसंतनगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस तुला लाईट देत नाही तु माझ्या घरी कशाला आलास असे म्हणुन शिवीगाळ करून लाथाबुक्याने मारहाण करून लाकडाच्या दांडयाने मारून हात फॅक्चर केले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी केशव पि. रामचंद्र पारदे, वय 55 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. देवगीरी निवास समोर वसंतनगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 18/2023 कलम 325, 324, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री शिंदे, मो. नं. 9075479885** हे करीत आहेत.

## 5)जुगार :—

**1)भाग्यनगर :—** दिनांक 22.01.2023 रोजी 16.15 वा. चे सुमारास, **पावडेवाडी शिवारात जांबवाडी येथे मोकळया जागेत ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांना अंदर बाहर नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 4,270/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2294,. किशोर पांडुरंग हुंडे, ने पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 28/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/209 मंगनाळे, मो.क्रं. 8805013480** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 34 / 2023 दिनांक : 23.01.2023**

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे"** यांची जयंती साजरी

23 जानेवारी, 2023 सोमवार रोजी **"नेताजी सुभाषचंद्र बोस** व **बाळासाहेब ठाकरे"** या महापुरूषांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे सह सर्व उपस्थितांनी पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, पोउपनि **श्री उत्तम वाघमारे**, यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार तसेच मंत्रालयीन कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **सपोउपनि / सुर्यभान कागणे, मपोकॉ / शामका पवार, पोकॉ / विनांदे भंडारे** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड



# <u>प्रेसनोट</u>

<u>पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 35/2023 दिनांक : 23.01 .2023</u>

सायबर शाखेने फिर्यादीस दोन गुन्हयात परत मिळवुन दिले 2,54,780/—रूपये....

फिर्यादी विनायक गोपाळराव फुटाणे, यांचे मोबाईल क्रमांकावर युनो नेट बँकीगची लिंक आली होती. व त्या लिंकवर क्लिक करून आधार कार्ड, पॅन कार्ड, इत्यादी माहिती भरल्यामुळे फिर्यादी यांचे खात्यातुन 5,89,777/—रूपये काढुन घेण्यात आले होते. वगैरे फिर्यादवरून पोस्टे भाग्यनगर गुरन 11/2023 कलम 420, भादवि सह कलम 66(डी) आय टी ॲक्ट अन्वये गुन्हा दिनांक 09.01.2023 रोजी दाखल करण्यात आला होता. सदरची फसवणुक झाल्याचे फिर्यादीचे लक्षात येताच त्यांनी पोस्टे भाग्यनगर आणि सायबर पोस्टे नांदेड येथे संपर्क साधला होता.

दुसऱ्या एका प्रकरणात अर्जदार तुषार गजानन आमदुरे यांचे मोबाईलवर अनोळखी व्यक्तीने लिंक पाठवली व त्या लिंकवर अर्जदार यांनी क्लिक केल्या नंतर तक्रारदार यांच्या खात्यातील गुगल पे द्वारे 40,000/—रूपये काढुन घेण्यात आले होते. वगैरेचा अर्ज दिनांक 08.01.2023 रोजी पोस्टे विमानतळ येथे देण्यात आला होता. वरील दोन्ही प्रकरणातील ऑनलाईन फसवणुक झाली होती. फिर्यादी व अर्जदार यांनी तात्काळ सायबर पोस्टे नांदेड येथे येथे संपर्क साधला असता पोनि नानासाहेब उबाळे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्री थोरवे, पोना/विलास राठोड सायबर पोस्टे नांदेड यांनी दोन्ही प्रकरणातील फिर्यादी व अर्जदार यांचेकडुन घडलेल्या घटने बाबत सर्व माहिती हस्तगत करून तात्काळ संबधीत बँका व वॉलेट यांचे नोडल अधिकारी यांचेशी इमेलद्वारे संपर्क साधुन संबधीत बँका आणि वॉलेट यांनी तात्काळ कारवाई करण्यास भाग पाडुन. सदर कारवाईच्या अनुषंगाने संबधीत बँका आणि वॉलेट यांचे नोडल अधिकारी यांचेशी वेळोवेळी पाठपुरावा करून ऑनलाईन फसवणुक झालेली दोन्ही तक्रारी मधील एकुण 6,29,777/—रूपया पैकी 2,54,780/—रूपये फिर्यादी व तक्रारदार यांचे खात्यात जमा करण्यात भाग पाडुन चांगली कामगीरी केलेली आहे.

सदरची कामगीरी ही **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री अबीनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **डॉ. श्रीमती अश्विनी जगताप मॅडम**, पोलीस उप अधिक्षक (मु) नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड